ज्ञानदीप लावू जगी

# पुणे नगर वाचन मंदिर

स्थापना : ७ फेब्रुवारी १८४८

email : pnvm1848@gmail.com
www.punenagarvachan.org

| | | |
|---|---|---|
| पुस्तकाचे नाव | : | भोर संस्थानचे आद्य संस्थापक श्रीमंत शंकराजी नारायण पंतसचिव यांचा पोवाडा |
| लेखक | : | अनंत विष्णु मुळे |
| प्रकाशक | : | अनंत विष्णु मुळे, नाशिक |
| प्रकाशन वर्ष | : | १९३१ |
| मूळ ग्रंथ प्रत | : | शिक्षण प्रसारक मंडळी, पुणे |

पुणे नगर वाचन मंदिर

अंकेक्षण (डिजीटायझेशन) प्रकल्प

अंकेक्षण रुपांतर - २०२३

भोर संस्थानचे आद्य संस्थापक

श्रीमंत शंकराजी नारायण पंतसचीव यांचा

# पोवाडा.

-अनंत विष्णु मुळे.

महाराष्ट्र शाहीर मंडळ, नाशिक.

सन १९३१.

किंमत ०२ आणे.

# प्रास्ताविक दोन शद्ब.

भोर संस्थानचे आद्य संस्थापक श्रीमंत शंकराजी नारायण यांची समाधी भोरचे आग्नेय दिशेस भोर पासून ९ मैलावर आंबवडें या गांवीं आहे. तेथें त्यांची पुण्यतिथी त्या ठिकाणीं समाधी झाल्यापासून प्रतिवर्षी कार्तिक शुद्ध १२ ला धार्मिक विधीनें होत असते. हल्लींचे संस्थानाधिपति श्रीमंत बाबासाहेब पंतसचीव यांनीं हा उत्सव पूर्वापार वहिवाटीप्रमाणें आंबवडें येथें कायम ठेऊन त्याच वेळीं भोर येथें तो २ दिवस मोठ्या प्रमाणावर साजरा करण्याचें गेल्या सालीं ठरवून त्याप्रमाणें जाहीर केलें.

या समारंभाचें प्रसंगीं ऐतिहासिक व्याख्यानें पोवाडे वगैरे कार्यक्रम होणार असल्याचें कळल्यावरून त्या प्रसंगीं ह्मणण्यास योग्य असा श्रीमंत शंकराजी नारायण यांचेवर पोवाडा रचून तो ह्मणून दाखवावा असें माझें मनांत आलें. व त्याप्रमाणें मी आमचे भोर येथील मित्र श्रीयुत नारायण महादेव भिडे बी. ए. यांना सदर पुरुषाची ऐतिहासिक माहिती देणेंबद्दल विनंति केली व त्यांचेकडून माहिती मिळाल्यावर मी हा पोवाडा रचला व तो गेल्या सालचे समारंभाचे वेळीं भोर येथें म्हणून दाखविला. हा पोवाडा श्रीमंतांना व सर्व

मंडळींना पसंत पडल्यावरून तो मी श्रीमंतांच्या परवानगीनें प्रसिद्ध करीत आहे.

मराठी साम्राज्याची ढासळलेली इमारत पुन्हां उभी करण्याचे कामीं शंकराजी नारायण यांनीं जी बहुमोल कामगिरी केली तिची बरीचशी माहिती प्रकृत पोवाड्यावरून महाराष्ट्रीयांना होऊन त्यांच्या मनांत शंकराजी नारायण यांचेबद्दल व त्यामुळें सचीव घराण्याबद्दल अभिमान व आदर उत्पन्न झाल्यावाचून राहणार नाहीं अशी माझी पूर्ण खात्री असल्यानें हा पोवाडा प्रसिद्ध करावा असें माझे मनांत आलें.

याकामीं माझे मित्र भोरचे विद्याधिकारी श्रीयुत आण्णासाहेब जोशी, श्रीयुत नारायणराव भिडे व वरील उत्सवाचे व्यवस्थापक श्रीयुत बळवंतराव वाळिंबे यांनीं अनेक प्रकारें केलेल्या मदतीबद्दल मी त्यांचा आभारी आहे.

सचीव घराण्याचा उत्तरोत्तर उत्कर्ष होवो अशी श्रीप्रभूचरणीं प्रार्थना करून ही अल्प प्रस्तावना पुरी करतों.

ता. १ आक्टोबर
सन १९३१ इ.

अनंत विष्णु मुळे.

भोर संस्थानचे आद्य संस्थापक

श्रीमंत शंकराजी नारायण पंतसाचिव यांचा

# पोवाडा.

[ चालः— धन्य धन्य भूपाळ० ]

पंतसाचिव शंकराजि धन्य नर वीरमणी जन्मला
तयानें हिंदुधर्म राखिला! ॥ धृ० ॥

( १ )

एकाचि होता क्षात्रतेज अन् ब्राह्मतेज उज्वळ,
हदरे मोंगल राजेश्वर;
रायगडीं शिवराज निमाला, पाहुनि संधी बडी,
दिल्लिपति दख्खनवरि घे उडी;
हैदोस घालुं लागला
' मरहाट ' म्हणे ' जिंकीन; '
घालुनी पीळ तो मिशिला
' काफरा ' म्हणे ' नमवीन; '
' बुडवीन मऱ्हाट्शाहीला
सब् मुसल्मनि मी करिन;
लावीन मांस खायाला
खांडुळी गाइची करुन. '
धर्मक्षेत्रें पवित्र तीर्थें बाटवीत चालला
धर्मा वर्मि-घाव घातला ॥

( २ )

पाडि देउळें सफा धडाधड, पीठ मूर्तिचे करी,
धरी तलवार हिंदुच्या शिरीं;
अफाट सेना जय्यत सारी–टोळधाड उतरली
महाराष्ट्राचा घ्याया बळी;
गर्जला शंभु रणशूर
' मोडींन खोड यवनाची,
' मातलासि दुष्टा! फार
गांठ ही पडे वैराची.
' मी काळासिहि झुंजार,
ही सद्दी शिवशाहीची,
' दैवाचं फिरलं वारं,
परि दर्द न मज मृत्यूची '
आग पेटली चहुं बाजूंनीं, शंभु न लव पोळला,
हड्डी मोडुनि रिपु चुराडिला ॥

( ३ )

मांडियला थैमान संकटें, सिंह कोपला खरा,
नखाग्रीं लववी रिपु करकरा
सिंह धरुनि वागुरीं मारिला, हाल हाल करुनिया
राखिला धर्म, मृत्यु वरुनिया;
हा शंभु जाइ अस्तास
काळजी पडे देवाला;

घालता हात खड्गास,
संकटीं कोण ये काळां;
तीं करी भवानी घोष
‘ तारीन हिंदु धर्माला ’
‘ तारीन हिंदु राष्ट्राला ’
ये भरति शौर्य सिंधूस,
ये स्फुरण महाराष्ट्राला.
घाव लागला बुडख्यात्ररती, उलट कोंब ये नवा
कळतसे जगरीती मानवां ॥

( ४ )

तोडिति लचके बाच्छाईचे, लढति मावळे किती !
गनिमी कावा बहु दाविती;
समशेरींचें पाणि पाजिती, रिपु टाकिति चिरडुन
करिती विव्हळ त्या दारुण;
खांदासि खांद लावीती,
पाहती न जवळी कोण;
शूद्रासी ब्राह्मण मिळती,
स्वातंत्र्य क ज जाणून;
गाजते तयांची कीर्ती,
ते मिळले लढले ह्मणुन;
परि आज हाय ही झुजतीं
कोंबडीं हिंद–संतान·

जाति-दुहींच्या तीव्र विखारें देश नष्ट होइल,
झणुनि हा एकवटे मावळ ॥

(५)

जिंजीवरती राजारामा ठावियले संगतीं
मावळे धैर्यांचे सोबती;
रामचंद्र आमात्य जाहले मग दख्खनचे धनी,
गर्दी करिति रिपू धावुनि;
चिंतातुर होती पंत
आठवीत राजाराम;
कीं नसतांना धनि येथ
युक्त कै अम्हां आराम ?
कुलमुख्त्यारी कधिं होत
का सांगा निमक हराम ?
पंतें मनिं धरुनी हेत
मग केला निश्चय ठाम;
शंकराजि नारायण असतां कलम बहादर भले,
तयातें पागनीस नेमिलें ॥

( ६ )

टाकि लेखणी अतां अस्तनी सरसावुनि सत्वरी
वागवी समशेरीतें करीं,
स्वामिभक्तिची देशभक्तिची ज्योत मनीं चेतली
हाक त्या भवानिची ऐकिली

करि मोगल हलकल्लोळ
गडहुडें घेउनी हातीं
चांदवा निशाणावरिल
करि चालहि भगव्यावरती
घर धन्या खडं चारीलं
त्या ठायी हे मिरवीती
फितवून कैक ठकवीलं
हे जहांपन्हा ह्मणवीती
ठाणीं ठेवी प्रांतोप्रांतीं अवरंग्या तोषला
मऱ्हट्टा ह्मणे पुरा कोंबला ॥

( ७ )

तिकडें खान अमीरा जमवुनि मानमरातब दिलं
शहानं खैरातहि भरपुर
इकडें सुस्थहि नव्हति मावळे, शंकराजि नरवर
घालिती झडप मोगलांवर;
राजगडा धडकी दिधली
शिवबापरि रणशौर्यानं;
चढविली घोरपड, केली
सुमवृष्टी तानाजीनं;
गडचोरवाट हळु चढली
लढविण्या खूप शर्थीनं;
चांदवा लोटिला खालीं
मारितां लाथ त्वेषानं;

" शिवसरजाच्या सिंहासनीं तूं अशुभ निशाणा ! कसा
मिरविसि ? लाथडितो तुज असा " ॥

( ८ )

रणवाद्यें धडधडा वाजतीं " छत्रपती कीं जय "
मावळे गर्जति होतां जय ;
शंकराजिनं केला किल्लेदार ठार, भूवर
तयाची कीरत अजरामर;
रामचंद्रपंत बहु खूष
वाइच्या सुभेदारीस
देउनी शंकराजीस
कळविलें वृत्त भूपास
ये गहिंवर त्या स्वामीस,
बोलला तया शाबास
मजसाठिं घेतला त्रास
' तूं धन्य वरि आम्हांस '
महाराज ह्मणति ' शाबास '
मदारुल् महाम् किताब वस्त्रें भरजरिचीं धाडिलीं
शोभे खासा बिरुदावली

( ९ )

भगवा झेंडा छत्रपतीचा चहूंकडे फडकला
घाटमाथींचा गड घेतला;

पाराधि बसले टपून, म्हणती शिकार साधू भली
गनिमा गाडूं गडगोहरीं;
परि मस्त म्लेंछ कटकाचा
खुंटली न गती अलुमाळ;
धनगडानाजिक शाहाची
छावणी पडे ते वेळ;
मोताद अन्नपाण्याची
पडतांचि ओढवें खूळ
पळविती खान अमिरांची
घोडीं कुणि देउनि भूल;
लाल इंगळापरि करि डोळे, कुठ मारूं मी दडी
शहासी चिंता ही हरघडी ॥

( १० )

" काय करूं या सैतानाना ? सुखें रहावे कुठें ? "
तिळ तिळ जीव शहाचा तुटे;
" खांदींवरि मी घाव घातला, असा न पागल कुणी,
बघतों मूळ अतां गवसुनी. "
चंदीस सैन्य धाडीलें
पकडावा राजाराम;
औरंगशहा मग बोले
' होइल हें फत्तें काम '
परि पुन्हां लक्ष वेधीलें
जिंजचिं ऐकुनि नाम;

शंकराजि तुटुनी पडले
जाणून शत्रुचें वर्म;
जिकडुन तिकडुन वीर मराठे यवनावरि धावले,
नांवहि मावळचें गाजलें ॥

(११)

शूरवीर जमविले, तयांना प्रांत वाटुनि दिले,
अमात्यें यश बहु संपादिलें;
शंकराजिसी मावळ खोरं, पौडहि, इंदापुर,
राजपुरि, चौल, मिळे जुन्नर;
शिवबाच्या या भूमीचं
करि रक्षण ब्राह्मण वीर;
शिवबाच्या या किल्यांच
करि रक्षण तो रणशूर;
उजळवी हिंदु धर्मीचं
तेज तो पुरुष गंभीर;
बुडवाया पद म्लेंच्छाचं
परशुराम घे अवतार;
जिंजीहूनी माय-भूमिला महाराज पातले,
प्रजेसी समाधान दाटलें ॥

(१२)

गुढ्या तोरणें उभारुनी जन करिति विजयोत्सव,
वाचलें महाराष्ट्र वैभव;

मदारुल् महाम्, अमात्य आणिक परशुराम त्रिंबक
भेटतां राजारामा सुख;
स्वामीस करिति हे विनती
" हें राज्य तुह्मी करिं घ्यावें; "
हे बोल, जे न बाळि पडती
स्वार्थास, तयेंचि वदावें;
स्वामिभक्ति, देश-प्रीती
दाविति त्या शूर गणावें;
राजे मग त्याते म्हणती
' हे जतन तुह्मींच करावें '
गौरव झाला तिघेजणांचा, 'सचिवपदा' तें दिलें
शंकराजिसी सार्थ शोभलें ॥

( १३ )

शहासि कळले, मराठा धनी स्वदेशांत परतला,
घेउनि सैन्य माग काढिला;
पुण्यांत सर्जेखान राहिला, नाकेबंदी करी,
तयाही साडेसाती खरी;
धाडिला हुकुम राजांनीं
सचिवासी ' खान पहावा,
मावळा तुह्मी जमवोनि
मस्तवाल राणीं चिरडावा;

परशुराम त्रिंबकजींनीं,
करणें रिपु पाठपुरावा; '
रोटिला यवन दोघांनीं
दावूनि गनीमीकावा;
फेस तोंडिं ये मोगल सेना पाणि रणीं मागत
पाणी समशेरींचं तिथ ॥

( १४ )

' पुढें पाठ अन् सपाट मागें ' ह्मण सार्थक जाहली,
सचिवें ठाणीं परत जिंकलीं;
इकडें मिळवी, गमवी तिकडें; तेल तूप सांडिलें,
हतामधिं धुपाटणें राहिलें;
दिलं धुडावून खानाला,
वृत्त हें शहासी कळलें;
धाडिलं सैन्य मदतीला,
चवताळुनि तेंहि निघाले;
दुर्दैव जडे देशाला,
महाराज कालवश झाले;
या ऐकुनि दुर्वार्तेला
बेहोषुन दिलिप डोले;
ह्मणे ' मरगये काफर, आह्मां साह्य खुदाचें असे,
मऱ्हट्टे काय आतां मशकसें; '

( १५ )

वादळ उठलें भरलें साऱ्या दिशीं जोर तें करीं,
जयाश्रिहि होइ तदा बावरी
वणवा लागे पडतां ठिणगी, ज्योत नभा लागली,
तिथें रिपुसेना होळापिली;
चहुकडं लिहुनि कळवीलें
त्या चतुर राज़पत्नीनं;
मंत्र्यासी पाचारीलें
' या सिंहगडावरि ' ह्मणुनं;
सदरेस करुनि ते वेळे
शिवपौत्राच्या नांवानं;
गौरवून बाई बोले
कीं ' देश बुडो ना देणं '
अमात्य, सेनापती मिळालें सचीव ते बिनिवर
भजाया महाराष्ट्र-मंदिर

( १६ )

सेनें केला दरमजली कुच, मुलुख पुन्हां वेढला,
वेढा सिंहगडातें दिला;
गड घेउनि ती पुढें चालतां शंकराजि बिलगला,
सिंहगड सर करुनी घेतला;
आवडता तानाजीचा
गड सिंहाचा जिंकीला;

चौफेर कोट छातीचा,
करि, राखि राष्ट्रनांवाला;
घेउनी घोट नरडीचा
दे स्वर्गवाट गनिमाला;
बक्षिदावक्ष प्रेमाचा
गड अल्लाचा हिसकीला;
‘ या तोबा ! निसटला माझिये हातुन प्यारा गड ! ’
शहाची छाति उडे धडधड ॥

( १७ )

‘ अया मऱ्हाठा गनिम बडा तो, ’ स्वप्नीं हें बडबडे,
तळमळे जीव सारखा कुढे;
‘ गया सिंहगड काय करूं मी ’ शहा बहू हळहळे
गनिमकी बिजली शिरिं कोसळे;
मर्मीं हा बसला धक्का
कोसळा पडे औक्षासी;
पापासि घावला मोका,
मग शांति कुठें शाहासी;
मर्द तो लढाऊ बाका,
नरमला परी दैवासी;
पाडिलें फशी कै लोकां
अडकला अंति फासाशीं
शत्रु दळामाधिं दाट मातला हाट, तयीं फिरविला
पुरंधर सचिवांनीं एकला ॥

( १८ )

अजिंक्य शत्रू जिंकुनि सर्वे महाराष्ट्र सेविला
गाजला रणफंदी मोहरा;
शेंडि राखिली हिंदूची निज जीवा काचावुनी
छत्रपति सरजापरिस कुणी ?—
पुढारा त्याच्या पदवदनीं !
शाहूची सुटका झाली,
हे ताराबाइस कळलें;
अंतरीं चरकली भ्याली,
सरदार तिनें जमवीले;
बोलली ' दुर्गती आली,
' आधार तुह्मी या वेळे;
' ही आण तुह्मां मी घाली
शिव दौलत राखा सगळे. '
शाहु ' तोतया ' अशी तिघेही दुधभाताच्यावर
देती इमान ठेउनि कर ॥

( १९ )

कलहाग्नी चेतला, भडकला, शंकराजि डममगला,
शाहुनें भेटिस बोलाविला;
' वचनभंग करणार नाहिं मी चंद्रसूर्य जोंवरी ,
शाहुसि कळवी हें सत्वरी;
परि मर्मि लागला कांटा
शपथेत वृथा सांपडलें;

हा शाहू वारस मोठा
त्या शब्दासि न आदरलों;
रोखुनी तयाच्या वाटा,
सत्पक्षा मी आंचवलों;
परि इमान कोण मराठा
मोडील जयें मी नडलों ?
शाहु छत्रपति सैन्य पाठवी घ्याया किल्ले गड
शंकराजीस पडे सांकड;

( २० )

इकडे जातां आड लागला, विहीर दुसरीकडे,
संकटीं शंकराजि सांपडे;
हात न उचली त्या सेनेवर, विजय मिळावा कसा?
वीरहि झाला हतवीर्यसा;
शाहु पुत्र संभाजीचा
त्याचीच असे ही सेना;
हा नातू छत्रपतीचा,
त्याचीच असे ही सेना;
जरी फडशा करिन तियेचा
दुखवीन धन्याच्या प्राणां
बहुमोल बोल वीराचा,
परि स्वामिभक्तिचा बाणा;

राजगडावरि लोटे सेना डोळ्यांनीं पाहिली,
एकहि गोळी ना झाडिली;

( २१ )

शाहुछत्रपति विस्मित झाले, कळले सचिवांतर,
'असा ना स्वामिनिष्ठ भूवर !
'मजलागी मन दिलें तयानें, देह दुजाला दिला,
शब्दीं राव भला गुंतला'
नरवीर सुखें नांदावा
म्हणुनीया सेना नेई ;
शंकराजि ना दुखवावा
त्याचा न धुमाळा घेई;
हा स्वामिभक्तिचा ठेवा
आदरें भूप त्या पाही;
हा वीरश्रीचा छावा
पडला परि संशय-डोहीं
आंबवडें-क्षेत्रासि सराइत गुत्सद्दी चालला
मनामधिं निश्चय कीं बाणला

( २२ )

स्वदेश-कार्जीं यश मिळवीलें मळून ते जाइल
छातिनं काळा पाचारिलं;
मृत्यू वरिला, अकीर्ति टळली, स्वामिनिष्ठ राहिला,
भारता ! बघ मावळचा हिरा !

हिंदुचें नांव गाजाविलें
निर्दाळुन भय शत्रूचें;
अम्हि वंशज झालों दुबळें
बळ उरे आजि कलहाचें;
कलहें त्या वैभव गिळिलें
ब्राम्हण-क्षत्र-शूद्राचें
मर्द हो एक व्हा सगळे
द्या उपटुनि बीज दुहीचें
रामराज्य रघुनाथ चालवी पंतसचिव-वंशज
करिती पूर्वज कृतीचें चिज,
कवन-माळ शूरासि आर्पितों संधि आजि मज दिली
भोर-आधिपतिनीं ही चांगली.

---